ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
Janury-June 2024- Vol. 13 No. 1

# श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीतील भक्तीयोगाचे चिकित्सक अध्ययन

**कावेरी विक्रम खेडकर**

*एम. ए संस्कृत*

*भारतीय अध्यात्मशास्त्र परंपरेत मानवी जीवनासाठी कल्याणकारक तीन मार्ग सांगीतलेले आहेत. ज्ञानयोग, कर्मयोग आणि तिसरा भक्तियोग. तिनही मार्गाचे अधिकारी हे भिन्न भिन्न असून, विरक्त संन्यास्यासाठी ज्ञानयोग, वैराग्यरहित सकाम व्यक्तिसाठी कर्मयोग, न सर्वथा विरक्त, न आसक्त भगवत्कथादीमधे श्रध्दावान अशांसाठी भक्तियोग हा फलदायी सांगितलेला आहे. भक्तियोगाचे महत्व व वर्णन अनेक ठिकाणी आलेले आहे. सर्वत्र एकच परमात्मा आहे, त्यालाच अनंत नावांनी संबोधले जाते, असे वेद, उपनिषद, श्रीमद्भागवत,श्रीमद्भगवद्गीतेसह ज्ञानेश्वरी मध्ये भक्तिचे वर्णन आलेले आहे. पुराणातील भक्ति व भक्तांचे चरित्र कथन प्रसिद्ध आहेत. "नमो अरिहंताणां" वंदन नमनादिमधून जैन दर्शनामध्येही भक्ती संकल्पना सिध्द होते. "बुद्धं शरणं गच्छामि" "धम्मं शरणं गच्छामि" इत्यादि वचनामधून शरणागतीरूप भक्ति संपूर्ण बौध्द मतात स्वीकृत आहे. यावरून आस्तिक दर्शनासह नास्तिक दर्शनातही भक्ति प्रविष्ठ आहे, असे दिसून येते.*

*'भक्ति' हा मूळ संस्कृत शब्द असून 'भज्' धातूपासून भजणे, पूजा करणे, भक्तिभाव, आत्मियता, प्रेम या अर्थाने अभिप्रेत आहे. 'यूज्' धातुपासून जोडणे या अर्थाने 'योग' शब्द तयार होतो. याचा एकत्रीत अर्थ आपल्या पूजेने, सेवेने, भक्तिने स्वतःला भगवंतासी जोडणे, भगवत्स्वरूप होणे म्हणजे "भक्तियोग" असा होतो.*

भक्ति हा शब्द भज् सेवा करणे या संस्कृत धातूपासून बनला असला तरी, श्री. व्य. केतकर यांच्या "महाराष्ट्रीयन ज्ञानकोशात" भक्ती या शब्दाचे अर्थ विवेचन करतांना भक्ति या शब्दाचा केवळ भजने असा अर्थ न राहता ईश्वरोपासना या अर्थी तो शब्द रूढ झाला आहे असी नोंद आढळते. भक्ती या शब्दाचे वेगवेगळ्या कोशातील अर्थ उपासना, पूजा, आराधना, दृढभाव, भजन-पूजन, प्रार्थना, सेवा, श्रध्दा, भावभक्ती, निष्ठा, पूज्यभाव, आसक्ती, अनुरक्ती, प्रीती, ऐक्य असे अनेक प्रकारचे आहेत.

'भक्ती' शब्दाचा अर्थ समजून घेतल्यानंतर भक्तीच्या व्याख्या अभ्यासल्यास भक्ती संकल्पना आणखी स्पष्ट होण्यास मदत होईल.

*ऋग्वेद - इंद्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गुरुत्मान् II*
*एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति - अग्निं यमं मातरिश्वानमाहु II*

सर्वत्र एकच परमात्मा आहे, त्यालाच नाना नावांनी संबोधले जाते, असे ऋग्वेदात सांगितलेले आहे.

*उपनिषद - अग्ने नय सुपथा राये अस्मान् II*
*विश्वानि देव वयुनानि विद्वान II*

उपनिषदामध्येही भक्तिचे वर्णन आलेले आहे.

*नारदभक्ती सुत्र - "सात्वस्मीनपरमप्रेमरूपा"*
*"अन्यस्मात्सौलभ्यं भक्तौ"*

भक्तिची व्याख्या करत असतांना महर्षि नारद लिहितात - प्रेमस्वरूप ती भक्ती. भक्ति ही अन्य सर्व साधनांवरून सुलभ आहे असे महर्षि नारदांचे मत आहे.

*महाभारत - महात्म्यज्ञानपूर्वस्तु सुदृढः सर्वतोऽधिकः II*
*स्नेहो भक्तिरिति प्रोक्तस्तया भुक्तिर्न चान्यथा II १-८६-१०७*

भगवंताच्या महात्म्याचे ज्ञान करून घेऊन त्याचा स्नेह धारण करणे याला भक्ती असे म्हणतात.

*शंकराचार्यांचे -"स्वात्मतत्वानुसन्धानं भक्तिरित्यपरे जगुः*
*आत्मतत्त्वाचे अनुसंधान हिच भक्ति होय असे शंकराचार्यांचे मत आहे. II*

भक्ती संदर्भात अनेकांच्या मताचा विचार केला असता असे लक्षात येते की, भक्ती ही अध्यात्मीक क्षेत्रातील ईश्वराशी व त्याच्याविषयी निष्ठेसी संबंधीत आहे. भगवंतावरिल उत्कट प्रेमात तल्लीन होऊन देहभान विसरून त्याचे निस्वार्थ सतत ध्यान करणे म्हणजे भक्ति. भक्ती कोणत्याही प्रकारची असली तरी ती परमात्म्यासी तादात्म्य पावणारी असली पाहिजे व याच भक्तीने मानवाच्या जीवनाचे सार्थक होते. भक्तिप्रधान भागवत धर्माचे जे वेगवेगळे सांप्रदाय आहेत त्यांचे मूळ संस्कृत व प्राकृत ग्रंथात पाहावयाचे असल्यास आपल्याला श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीकडे जावे लागेल, हे सर्वमान्य आहे. कारण श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीची अशी थोरवी आहे की, हे दोनही ग्रंथ भक्तिमार्गाचे अनुयायी असणार्यांना सारखेच पूज्य आहेत. श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीमधे कर्म, भक्ती, ज्ञानयोगाचे वर्णन समान रूपाने पहायला मिळते. कर्मयोगाचे वर्णन प्रथम सहा अध्यायात,

भक्तियोगाचे वर्णन द्वितीय षटकात तर ज्ञानयोगाचे वर्णन अंतिम सहा अध्यायात आलेले आढळते.

**श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीतील भक्तीचे स्वरूप -**

भगवान श्रीकृष्ण व संत ज्ञानेश्वर महारांजाच्या भक्तीचा विचार केला असता ही भक्ती सर्वांना समान, चतुवर्ण व्यवस्था मुक्त, उच्चनिच स्थान रहित, सर्वांना बरोबर घेऊन जाणारी आहे.

**श्लोक -**

*मां हि पार्थ व्यपाश्रित्ययेऽपि स्युः पापयोनयः । स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ।।*

('श्रीमद्भगवद्गीता' अध्याय ९ श्लोक ३२)

पापयोनींचे तसेच, स्त्रिया, वैश्य, शूद्र सुध्दा मला सर्वथा शरण येवून निःसंदेह परमगतीला प्राप्त होतात.

त्याचप्रमाणे संत ज्ञानेश्वर महाराज सांगतात

*तैसी क्षत्री वैश्य स्त्रिया । का शुद्र अंत्यादी द्या ।*
*जाति तवचि वेगळालिया । जव न पवती माते* II

भगवंताच्या दरबारात मनुष्य निर्मित भेदांना जागा नसून, भगवंताला फक्त भक्तिपूर्ण अंतकरण लागते. प्राणीमात्राची सेवा, मानवजातीवर प्रेम, विश्वाच्या सुख दुःखाची चिंता, रंजल्या-गाजल्यांना सहारा हीच खरी भक्ती आहे. असे सांगुन स्वधार्माचरण, विहित कर्मातच ईश्वर आहे. असा संदेश त्यांनी समाजाला दिला. हेच संपूर्ण भक्तिशास्त्र त्यांनी आपल्या ग्रंथातून सहज सोप्या भाषेत सांगितले आहे.

अर्जुन जेव्हा आपला क्षत्रिय धर्म विसरून स्वतःच्या कर्तव्याला नाकारून हताश झालेला होता. तेव्हा भगवान श्रीकृष्णांनी कर्माचा त्याग सर्वथा नाकारून आपल्या वाट्याला आलेली कर्तव्य-कर्मे पूर्ण श्रध्देने करणे हीच भगवंताची पूजा आहे असे सांगितले.

भगवान श्रीकृष्ण सांगतात, जो पुरूष कर्मफलाची इच्छा न करता कर्तव्यकर्मे करतो तोच संन्यासी आणि योगी आहे. केवळ अग्नीचा त्याग करणारा योगी होवू शकत नाही. अशाप्रकारे श्रीकृष्ण संन्यास आणि योग नाकारून कर्तव्य कर्माला महत्त्व देतात. याउलट भगवान श्रीकृष्ण म्हणतात कर्तव्य कर्माशी विन्मुख न होता परमात्म्याची प्राप्ती करून घेता येते.

*मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्तमा मताः ।।*

(श्रीमद्भगवद्गीता -१२ श्लोक २ )

अर्थात माझ्या ठिकाणी मन ठेवून, नित्ययुक्त होवून, अतिशय श्रध्देने युक्त असे जे माझी उपासना करतात, ते सर्वांत उत्कृष्ट योगी आहेत.

अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे, ज्ञानाहून ध्यान श्रेष्ठ आहे. आणि ध्यानापेक्षाही सर्व कर्मांच्या फलाचा त्याग श्रेष्ठ आहे. कर्मफलत्यागामुळेच तात्काळ परमशांती प्राप्त होते. म्हणून अव्यक्तोपासने सारख्या कठीण साधनांपेक्षा सुलभ-सोपे साधन 'कर्मफलत्याग' हे अंगिकारून परमशांति प्राप्त करून घेणेचे योग्य आहे, असे भगवान श्रीकृष्ण श्रीमद् भगवद्गीतेत सांगतात. हा भक्तिमार्ग सर्वांसाठी खुला असून त्याद्वारे कोणीही मला प्राप्त करून घेवू शकतो.

**भक्तीचे प्रकार –**

श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीमध्ये एकनिष्ठ भक्तीचे खालिल प्रमाणे तिन प्रकार सांगितलेले आहेत.

१. **सात्विक भक्ती** - भेदबुध्दी न ठेवता केवळ पापक्षयासाठी किंवा ईश्वरार्पण बुध्दीने कर्तव्य म्हणून जी भक्ती केली जाते, तीला सात्विक भक्ती असे म्हणतात.
२. **राजस भक्ती** - विषयसुख, कीर्ती किंवा ऐश्वर्य मिळविण्याच्या इच्छेने ईश्वरास मूर्तीस्वरूप मानून जी भक्ती केली जाते, तीला राजस भक्ती असे म्हणतात.
३. **तामस भक्ती** - मी व ईश्वर भिन्न-भिन्न अशी भेदबुध्दी ठेवून ढोंग किंवा मत्सरबुध्दी यांपैकी एकाचा अवलंब करून केली जाणारी भक्ती तीला तामस भक्ती असे म्हणतात.

**अनन्य भक्ती** -

श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीमध्ये अनन्य भक्तीचे वर्णन करत असतांना भगवान श्रीकृष्ण सांगतात, अनन्य भक्त, काया-वाचा, मनाने केवळ मला शरण आलेला असतो.

*तनु मनु जीवे II चरणासी लागावे II अगरवता II करावे दस्य सकळ II*

किंवा

*मग मीचि डोळां देखिला । जिही कानीं मीचि आइकिला । मनीं मी भाविला । वानिला वाचा ।।*
*जे ऐसिया मातें जाणोनि । अहंकाराचा कुरूठा मोडोनि । जे जीवेम कर्मे करूनि । भजती मातें ।।*

ज्ञानेश्वरी, अ.९, ओवी १५९,४०८

तो डोळ्याने केवळ भगवंतालाच पाहतो. कानाने त्याचेच गुण ऐकतो. त्यालाच मानतो व मनात त्याच्याविषयीच भाव धरतो. हा भक्त एकनिष्ठेने मनःपूर्वक कर्मे करून भगवंताची भक्ती करतो. अशा भक्ताला अहंकारही असतो. पण, तोही केवळ आपण भगवंताचे भक्त आहोत, याचाच त्याला अहंकार असतो.

*जे अहंकारू वाहत आंगीं । आम्ही हरीचे भूषावयालागीं ।*
*जे लोभिये एकचि जगीं । माझेनि लोभे ।।*

'ज्ञानेश्वरी', अ.९, ओवी ३६२

हे भक्त स्वतःला हरीचे दास म्हणवून घेणे भूषणावह मानतात. त्यांना भगवंताच्या लोभाशिवाय इतर कशाचाही लोभ नसतो. म्हणूनच भगवंत अशा भक्ताच्या सेवेत कोणताही कमी-जास्तपणा न मानता, केवळ त्याच्या भक्तिभावानेच संतुष्ट होतो. अशाप्रकारे श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीमध्ये एकनिष्ठ भक्तांचे लक्षण विशद केले आहे.

**भक्तीचे अधिकारी -**

श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीमध्ये भक्ती धर्माचरणासंबंधीत कोणतेही विषमता नसून. परमेश्वर प्राप्तीचा सूलभ असा भक्तीमार्ग आचरण्याचा अधिकार सर्वांना आहे,

*अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।।*
*साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ।।*

अ.९, श्लोक ३०

त्याचप्रमाणे संत ज्ञानेश्वर महाराज सांगतात

म्हणोनि कुळ उत्तम नोहोवें । जाती अंत्यजहि व्हावें ।
वरी देहाचेनि नांवें । पशुचेही लाभो ।।

'ज्ञानेश्वरी', अ.९, ओवी ४११

उत्तम कुळात जन्म घेतलेला असो अथवा कोणत्याही जातीत, कुळात अथवा पशू जरी असेल तरी त्याला भक्ती करण्याचा अधिकार प्राप्त होतो, अशी त्यांची भूमिका आहे.

**निष्काम भक्ती**

भक्तीचा सर्वात महत्वाचा प्रकार म्हणजे 'निष्काम भक्ती'. 'निष्काम' या शब्दातच या भक्तीचे वैशिष्टय सामावलेले आहे. निः + काम = निष्काम म्हणजे कामनारहित. 'निष्काम भक्ती' म्हणजे कामनारहित देवाची उपासना करणे. फलाची अपेक्षा न करता जी भक्ती केली जाते, तीला निष्काम भक्ती असे म्हणतात.

*श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीमध्ये निष्काम भक्तीचे विश्लेशन करतांना संत ज्ञानेश्वर महाराज सांगतात*

*तें तैसेचि उचित करी । परी साटोप नोहे शरीरीं ।*
*आणि बुध्दीही करोनि फळेवरी । जायेचिना ।। ४६।।६*

निष्काम भक्त आपल्या कुळधर्माला अनुसरून आणि आपल्या जातीला अनुरूप असे सर्व कर्म करतो. परंतु, अशा कर्माने कधीही लज्जीत व गर्विष्ट होत नाही. तसेच मनानेही त्या केलेल्या कर्माच्या फलाची अपेक्षा करीत नाही. तो आपल्या वाट्याला आलेले गृहस्थाश्रमातील सर्व कर्म करून कर्मफलाची अपेक्षा करीत नाही. त्यामुळे, आपोआपच त्याला योग्यांना जे सुख लाभते तेच सुख प्राप्त होते. हीच 'निष्काम भक्ती' होय.

**भक्तीचे फळ**

भक्ती करण्याचा मुख्य उद्देश काय असावा यावर अनेक मतमतांतरे आहेत. परंतु जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळवून परमेश्वरपदाला प्राप्त होण्याच्या आकांक्षेने भक्ती केली जाते, असेच अभिप्रेत आहे.

भक्ताच्या भगवान श्रीकृष्ण सांगतात भक्त कोणत्याही जातीचा असला तरी त्याने प्रेमभावाने भजन केल्यास, त्याला शरीराच्या म्हणजे जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळते. तो भलेही पापी असो परंतु आयुष्याच्या शेवटच्या वळणावर जरी त्याने भक्ती केली तरीदेखील त्याला मुक्तीचा अधिकार प्राप्त होतो.

'ऐसे भजतेनि प्रेमभावें । जया शरीरही पाठीं न पवे ।
तेणें भलतया व्हावे । जातीचिया ।।

'ज्ञानेश्वरी', अ.९, ओवी ४१५

ऐसे जे मत्पर । उपासिती निरंतर । ध्यानमिषें घर ।
माझें झाले ।।

'ज्ञानेश्वरी', अ. १२, ओवी ८०

सगुण रूपाची भक्ती करता-करता त्या भक्ताची पात्रता वाढत – वाढत त्याला शेवटी निर्गुणाची प्राप्ती होते.

अशाप्रकारे श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीमध्ये भक्ताची गती याविषयी सांगीतलेले आहे.

**निष्कर्ष**

भक्ती करत असताना अंःतकरणात कोणतीही कामना न ठेवता केवळ प्रेमभावनेने देवाला शरण जावे. सर्वभूतमात्रांत विश्वात्मक परमेश्वराचे स्वरूप जाणून सर्वसमभाव ठेवने हाच भक्तीचा मूलमंत्र आहे. जप-तप, व्रत, उपवास इत्यादी कर्मकांड करून शरीरास पिडा देण्याची आवश्यकता नाही. अंगात बळ नसेल तर तीर्थयात्रा करण्याचीही गरज नाही. नाना प्रकारच्या देवतांचे भजन- पूजन न करता, स्वधर्माचरण करणे हेच हितावह आहे. अन्य देवी देवतांची भक्ती न करता आपला स्वधर्म आचरण करावा, आपल्या आराध्य दैवताच्याच भक्तीत रममाण असावे. आपले कर्म मनापासून व कोणत्याही अपेक्षेशिवाय करावे. कर्मच देवाची सेवा मानली तर, तीच सर्वश्रेष्ठ भक्ती असून स्वकर्मकुसुमांनी केलेल्या भक्तिनेच भगवंत संतुष्ट होतो.

अशाप्रकारे श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीमध्ये भक्ती सिध्दांताविषयी विचार आलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ -**

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
Janury-June 2024- Vol. 13 No. 1

१. स्वामी श्री विद्यानंद सरस्वती , वेद रहस्य,कथांक , कल्याण गीताप्रेस गोरखपुर पृ. 223.
२. गोयन्दका हरिकृष्णदास (अनु) ईशादी नौ उपनिषद् , ईशावास्योपनिषद् मंत्र. १८, पु.मु.२८, गीताप्रेस गोरखपुर, पृ.१८.
३. जोशी निलेश (संपा) नारद भक्ती सूत्र, अध्याय १ सूत्र २ ईबुक प्रकाशन प्र. आ. पृ.१.
४. गोयन्दका जयदयाल (संपा) श्रीमद्भगवद्गीता अन्वयार्थ सुगम टिपा,अ.९ श्लो. ३२ गीताप्रेस गोरखपुर, आ,१५ पृ.२३५.
५. कुंटे अण्णा मोरेश्वर, (संपा) श्री ज्ञानेश्वरी, संत ज्ञानेश्वर, अ. ९, ओ.४६०, श्रीवामनराज प्रकाशन सिंहगड पुणे, आ. पाचवी , पृ २०४.
६. उ.नि श्रीमद्भगवद्गीता, अ १२,श्लो २ पृ.३०२.
७. उ.नि. श्री ज्ञानेश्वरी अ.४ ओ.१६७ पृ.८३.
८. तत्रैव - अ.९ ओ.४०८ पृ.२००
९. तत्रैव - अ.९ ओ.३६२ पृ.१९७.
१०. उ.नि. श्रीमद्भगवद्गीता, अ. ९, श्लो. ३० पृ.२३४..
११. उ.नि. श्री ज्ञानेश्वरी अ.९ ओ.४४१ पृ.२०२.
१२. तत्रैव अ.६ ओ.४६ पृ.१०४.
१३. तत्रैव,अ.९ ओ.४१५ पृ.२०१..
१४. तत्रैव,अ.१२ ओ.८० पृ.३८०.